# *बृहन्मुंबई महानगरपालिका*

## घन कचरा व्यवस्थापन खाते

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत

पोटकलम ४(१) (बी) अन्वये

*घन कचरा व्यवस्थापन*

खात्याची माहिती



नियमपुस्तिका - १२

घन कचरा व्यवस्थापन खात्यास दिल्या जाणा-या अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या, वाटप करण्यात आलेली रक्कम आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-याच्या सविस्तर माहितीसह, अंमलबजावणीची पध्दती.

(दि. ३१.०३.२०१५ पर्यंत सुधारीत)

झोपडपट्टीत राहणा-या लोकांचे आरोग्य अबाधित राहावे म्हणून त्यांच्यासाठी घनकचरा व्यवस्थापन खात्याने 'दत्तक वस्ती योजना' याद्वारे स्वच्छता राखण्यात येत होती. सदर दत्तक वस्ती योजना दि. ३१.०३.२०१३ पासून बंद करण्यात आलेली आहे व त्याऐवजी दि.०१.०४.२०१३ पासून "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" (वस्ती स्वच्छता योजना) ही योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्याने सुरू केली आहे. मुंबई शहर व उपनगरात विस्तारलेल्या झोपडपट्टीक्षेत्रांमध्ये म.न.पा. आपल्या यंत्रणेमार्फत नियमीत स्वच्छतेच्या सेवा देणे शक्य नाही अशा वसाहतीमध्ये या योजनेद्वारे कार्य करते. हया योजने मध्ये एका एकक मध्ये १५० कुटुंबे किंवा ७५० लोकसंख्या असे प्रमाण असते. सदर योजनेच्या अंमलबजावणी करीता दरमहा सहाय्य अनुदान अधिदान करण्याकरीता एक एकक हे प्रमाण असते. त्याप्रमाणे एका एककाकरीता प्रति महा अनुदान रू. ५४००/- अधिक संस्थेला योजना कामामध्ये प्रबोधन, लोकसहभाग, जनजागृती, वातावरण निर्मिती इत्यादी अनुशंगीक खर्च करणे शक्य व्हावे या करीता एका एकका करीता प्रतिमहा रू. ६००/- इतके अतिरिक्त अनुदान अधिदान करण्यात येते. सदर योजनेच्या खर्चाकरीता सन २०१३-१४ हया आर्थिक वर्षाकरीता अंदाजे ८० कोटी रूपये एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर योजनेत प्रत्येक पात्रताधारक संस्थेला किमान ५ एकके व कमाल १८ एकके असलेला परिसर योजना अंमलबजाणी करीता देण्यात येतो. तसेच एककांच्या अशा गटाला या योजनेत "वस्ती" असे संबोधण्यात येतो. सदर योजना ही महानगरपालिकेच्या २४ विभागातील परिसरात कार्यन्वीत करण्यात आलेली आहे.